ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8 ]
Total No. of Printed Pages : 8 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45 ]
Total No. of Questions : 45 ]

**A**

**CCE RR**
**REVISED**

Question Paper Serial No. **30**

येथून कापा.

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**
**Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**
**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 22. 09. 2020 ] [ Date : 22. 09. 2020
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

## विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

Tear here

I. **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** 6 × 1 = 6

1. माळ्याने बाग फुलवली. अधोरेखित शब्दाचा विभक्ती प्रत्यय सांगा.

   (अ) तृतीया (ब) पंचमी

   (क) सप्तमी (ड) चतुर्थी.

2. 'रामाने रावणास मारले.' या वाक्यामध्ये कोणता प्रयोग आहे ?

   (अ) कर्तरी (ब) कर्मणी

   (क) भावे (ड) यापैकी नाही.

3. "स्वानंदी लाडू खात आहे." या वाक्यामध्ये कोणता काळ आहे ?

   (अ) अपूर्ण वर्तमान (ब) पूर्ण वर्तमान

   (क) साधा काळ (ड) रिती वर्तमान.

4. न कर्त्याचा वार ........................ म्हण पूर्ण करा.

   (अ) सोमवार (ब) रविवार

   (क) गुरूवार (ड) शनिवार.

5. बाळाला झोप येण्यासाठी गायले जाते ते गीत

   (अ) बडबडगित (ब) भक्तीगित

   (क) अंगाईगित (ड) भावगित.

6. तुम्ही सर्वजन बेंगलोरला जा. अधोरेखित शब्दांची जात सांगा.

   (अ) नाम (ब) सर्वनाम

   (क) विशेषण (ड) शब्दयोगी अव्यय.

II. **पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा :** 4 × 1 = 4

7. परमेश्वर : परम् + इश्वर : : दुर्बळ : ...............

8. राजवाडा : राजाचा वाडा : : मीठमसाला : .............

9. उद्क : पाणी : : तनय : .................

10. अमावस्या : पौर्णिमा : : देशप्रेमी : ......................

III. **पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** 7 × 1 = 7

11. "सार्वजनिक सत्यधर्म" हे कोणाची थोरवी सांगणारे पुस्तक जाहे ?

12. म. फुल्यांनी कोणत्या समाजाची स्थापना केली ?

13. अक्काने लेखकाचे नांव "उत्तम" असे का ठेवले ?

14. गायी कोण हाकतो आहे ?

15. गुराख्याला जेवू घालण्यासाठी काय हवे असे आईला वाटते ?

16. वाळूमधल्या झिऱ्यासारवा काय पाझरता ?

17. "सुन्या तिच्याही दाही दिशा." या कवितेचा प्रकार कोणता ?

IV. **खालील प्रश्नांची उत्तरे सूचने प्रमाणे लिहा :** 3 × 2 = 6

18. वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) रामराम ठोकणे ब) तारीफ करणे.

19. अलंकार ओळखुन लक्षणे लिहा.

दिमाखात तारे नटोनी थटोनी

शिरी टाकिती दिव्य उल्का-फूले.

20. गण पाडून वृत्त ओळखा.

मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी.

V. **खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा :** 7 × 2 = 14

21. लेखक उत्तम कांबळ यांचा परिचय लिहा.

22. विंदा करंदीकर यांचा परिचय लिहा.

23. ''भजन आणि भोजन एव्हढंच तुम्हाला करता येतं वाटतं.'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

24. ''जातील कधी हे आई ? घरदार न याना कांही ?'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

25. राखीने दिलेले झाड वाढत का नव्हते ते सांगा ?

26. बेळगावी कॉग्रेसमधील घटनांचे वर्णन करा ?

27. होमामध्ये काय काय जाळतात ते सांगा ?

VI. **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** 1 × 3 = 3

28. (अ) ग्रंथ हेच गुरू

(ब) स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.

VII. **खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा :** 10 × 3 = 30

29. 'अनंतशक्तिः परमेश्वरू' कथेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

30. वसईच्या किल्यातील भेद जाणून घेण्यासाठी कोणीकोणी कसे प्रयत्न केले ?

31. 'शिल' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

32. पावसाळ्याचा हिशेब लेखकाने कसा घातला आहे ?

33. वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ?

34. हवा असलेला शकुन सांगण्यासाठी कवी कावळ्याला कोणकोणत्या गोष्टो देऊ करतो ते सांगा.

35. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय-काय प्रयत्न केले ? श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणो काय करणार आहे ?

36. कवीने कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय यांचे दाखले का दिले आहेत ?

37. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण कोण व कशाप्रकारे याचना करीत आहेत ?

38. 'धरण' कवितेचा सारांश लिहा.

VIII. **खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** $4 \times 4 = 16$

39. 'हाऊस वाइव्हज' या संस्थेची माहिती लिहा.

**किंवा**

कमीज खाँच्या समवेत झालेल्या स्त्रियांच्या क्लब पार्टीचे वर्णन करा.

40. डॉक्टरांनी शिबिरामध्ये कोणकोणत्या गोष्टींची माहिती दिली.

**किंवा**

डॉक्टरांनी घेतलेल्या शिबिराचा अदृश्य परिणाम कोणता झाला ?

41. हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ?

**किंवा**

'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

सकळास कळो ..............................................

...................................................................

.............................................. एक हो आम्ही.

**किंवा**

या भारतात ..................................................

...................................................................

................................................ हो इस्लामी.

IX. **पुढे दिलेला उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दा लिहा :** 1 × 4 = 4

43. भारतीय संस्कृतोने ज्ञानावर व प्रेमावर भर दिला. त्याप्रमाणेच बळावर भर दिला आहे. बळ नसेल तर ज्ञान व प्रेम ही मनांतल्या मनातल्या मरून जातील. ज्ञान प्रेमाला संसारात आणण्यासाठी सुंदर व सुखकर करण्यासाठी बळाची नितांत आवश्यकता आहे. बलवान शरिर निर्मळ व सतेज बुद्धी, प्रेमळ परंतू प्रसंगी वज्राप्रमाणे कठोर होणारे हृदय या सर्वाची जीवनाच्या विकासासाठी जरूरी आहे. तरच जीवनाला समतोलपणा येईल.

उपनिषदांतून बळाचा महिमा गाइलेला आह. दुर्बलाला काही करता येत नाही. एक बलवान मनुष्य येतो व शेकडो लोकांना नमवतो. बळ नसेल तर हिंडता फिरता येणार नाही. ज्ञान मिळणार नाही, अनुभव मिळणार नाही, थोरांच्या गाठीभेटी होणार नाहीत. गुरुसेवा होणार नाही, बळ नसेल तर काही नाही म्हणून बळाची उपासना करा, असे ऋषी सांगतात.

**प्रश्न :**

1) बळ नसेल तर काय होइल ?

2) जीवनाला समतोलपणा कधी येइल ?

X. **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** 1 × 5 = 5

44. व्यायामाचे महत्व सांगणारे पत्र तुमच्या लहान भावाला लिहा.

**किंवा**

बस वेळेवर सोडावी म्हणून बस डेपो मॅनेजरला अर्ज लिहा.

XI. **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :** 1 × 5 = 5

45. मी भारतीय जवान बोलतोय.

**किंवा**

झाडे लावा, झाडे जगवा.